पोलीस स्टेशन गेवराई ता.गेवराई,जि.बीड. सत्यमेव जयते

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** गेवराई
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0662 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/11/2025 02:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 08/11/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/11/2025
**Time From (वेळेपासून):** 15:01 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/11/2025 **Time (वेळ):** 02:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/11/2025 02:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 0.2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे गेवराई चे बाजुचे रो,गेवराई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सोपान सोनाजी चिट्टमपल्ले
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रत,बीड,बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रत,बीड,बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9518973185

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय दिंगबर आघाव | | | 1. मातोश्री निवास,,कालीका नगर , बीड,बीड,शिवाजीनगर,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रूपये दराच्या 40 नोटा | 20,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक -08/11/2025.

मी सोपान सोनाजी चिट्टमपल्ले, वय 43 वर्षे व्यवसाय-नौकरी,पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड मोनं 9270221064, 9518973185

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होऊन पो.ठा.गेवराई येथे हजर येवून फिर्याद देतो की,मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे दि-31-05-2025 पासून पोलीस उप अधीक्षक म्हाणून कार्यरत आहे.

दि-08-11-2025 रोजी अर्जदार शेख शाहनवाज शेख राजु, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा.संजय नगर, महादेव मंदिराजवळ गेवराई ता.गेवराई जि.बीड यांनी आम्हास आज रोजी फोन करुन माझी एका लोकसेवका विरुध्द तक्रार असल्याचे सांगुन आपण बीड गेवराई बायपास रोड गेवराई लगत सुरक्षीत ठिकाणी येवुन माझा सविस्तर तक्रार घेवुन कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली. त्यावरुन आम्ही सापळा पथकासह शासकीय वाहनाने बीड गेवराई बायपास रोड गेवराई लगत सुरक्षीत ठिकाणी पोहचलो तक्रारदार यांना फोन करुन संपर्क केला असता, तक्रारदार तेथे हजर आल्याने त्यांनी त्यांची तक्रार आम्हास कळवुन मला लिहिण्याचा सराव नसल्याने माझी तक्रार लिहुन घ्यावी अशी विनंती केल्याने तक्रारदाराने तक्रार कथन केल्याने पोलीस अंमलदार सुरवसे करवी लिहुन घेतली की, तक्रारदार यांचे मेव्हण्याचे विरूध्द पो.ठा.गेवराई येथे वाळू चोरीचा गुन्हा दाखल असून त्या गुन्हयामध्ये तक्रारदार यांचे मेव्हण्यास अटक न करण्यासाठी व गुन्हयाच्या तपासात मदत करण्यासाठी विजय आघाव पोलीस हवालदार पोलीस ठाणे गेवराई हे 40 ते 50 हजार रूपये लाच मागत आहेत वगैरे मजकुराची तक्रार दिली.
तक्रारदार शेख शाहनवाज यांची लिहुन घेतलेली तक्रार पंचाना दाखवला त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रार अर्जावर तक्रारदार, पंचानी व मी सहया करून तक्रारी अर्ज ताब्यात घेतला त्यानंतर तक्रारदार हे विजय आघाव पोलीस हवालदार यांची पोलीस ठाणे गेवराई येथे जावुन भेट घेणार असल्याने आम्ही व पंचानी दि. 08.11.2025 रोजी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला

त्यानंतर तक्रारदार शेख शाहनवाज यांनी पोलीस ठाणे गेवराई येथील पोलीस हवालदार विजय आघाव यांचे विरूध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते तक्रारदार यांचेकडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी दिनांक 08.11.2025 रोजी आम्ही सर्वानुमते लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला त्यावरून आम्ही तक्रारदार शेख शाहनवाज, दोन्ही पंच व सापळा पथकास तशा सविस्तर सुचना दिल्या तसेच माझे सुचनेवरून पोलीस अंमलदार श्री.खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याचे तक्रारदार व पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करून त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व तक्रारदार शेख शाहनवाज यांचे वक्तव्य घेवून व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचेकडे सुरक्षीत ठेवुन तक्रारदार शेख शाहनवाज व पंच क्रमांक-1 शेख शमशाद यांना तक्रारदार यांचेडील मोटारसायकलने पोलीस ठाणे गेवराई येथे पोलीस हवालदार विजय आघाव यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात आले त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार शेख शाहनवाज व पंच क्रमांक 1 शेख शमशाद असे आम्ही थांबलेल्या सुरक्षीत स्थळी शासकीय वाहाजवळ परत आले तेव्हा तक्रारदार शेख शाहनवाज यांचे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार खरसाडे यांनी बंद केले व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण मी, तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये विजय आघाव पोलीस हवालदार यांनी पंच क्र 01 शेख शमशाद यांच्या समक्ष तक्रारदार शेख शहनवाज यांच्या मेव्हाण्याच्या विरूध्द दाखल गुन्हयात आरोपीस अटक न करण्यासाठी व गुन्हयाचे तपासात मदत करण्यासाठी 30000/- रूपये लाच मागणी करून 30000/- रूपये लाच स्वत: स्विकारण्याचे मान्य केले. लाच पडताळणी कारवाई दरम्यान विजय आघाव पोलीस हवालदार यांनी लाच रक्कम 30000/- रूपये पोलीस ठाणे गेवराई येथे घेवून येण्याचे सांगितल्याने दिनांक 08/11/2025 रोजी पोलीस ठाणे गेवराई येथे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी

तक्रारदार यांनी कळवले की, माझेकडे 20000/- रुपये असल्याने 20000/- रुपये सापळयाचे आयोजन करावे अशी विनंती केल्याने आम्ही तक्रारदार यांचे विंनंती वरुन विजय आघाव यांचेविरुध्द 20000/- रुपये लाचेच्या सापळयाचे आयोजन करुन उर्वरित 10000/- रूपये नंतर देण्याचे ठरले. त्यांनतर माझे सुचनेवरून शासकिय वाहनात सुरक्षित स्थळी गेवराई येथे पोलीस अंमलदार गवळी यांनी अंथ्रासीन पावडर व आल्ट्राव्हालेंट लाईटच्या गुणधर्माची माहिती देवून तक्रारदार व पंचाना त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. विजय आघाव पोलीस हवालदार यांना लाच म्हणून देण्यासाठी तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/- रूपये दराच्या 40 नोटा एकूण 20000/- हजार रुपयेच्या नंबर व वर्णनाचे मोबाईलव्दारे फोटो घेवुन 500/- रूपये दराच्या 40 नोटाच्या रक्कमेला अंथ्रासीन पावडर पोलीस अंमलदार गवळी यांनी लावली सदरील अंथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा हया तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजव्या बाजूचे खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाना पुन्हा सविस्तर सुचना देवून विजय आघाव पोलीस हवालदार यांनी लाच स्विकारल्यानंतर माझ्या मोबाईलवर फोन करण्याचा इशारा करणेबाबत सुचना दिली तसेच सापळा टिममधील पंच क्र 02 सांगुळे व अंमलदार यांना त्यांचे काम समजावून सांगून तशा सुचना देण्यात आल्या पोलीस अंमलदार गवळी यांना शासकीय वाहनातील पाण्याच्या बॉटलने त्यांचे हात धुवून घेवून पुन्हा त्यांनी हात कोरडे केल्यानंतर त्यांच्या हाताचे परिक्षण पंचासमक्ष आल्ट्राव्हालेंट लॉम्पचे उजेडात करून त्यांचे हातावर ऍंथ्रासिन पावडरची हिरवट चकाकी दिसून न आल्याने सापळा पथकामध्ये त्यांना सामावून घेतले.

विजय आघाव पोलीस हवालदार यांना पोलीस ठाणे गेवराई येथे लाच रक्कम 20000/- रूपये देण्यासाठी तक्रारदार शेख शहनवाज हे व पंच क्र 01 शेख शमशाद हे तक्रादाराकडील मोटारसाइकल ने जाणार असल्याने माझे सुचनेवरून पोलीस अंमलदार खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार यांचे कडे सुरक्षीत ठेवुन तक्रारदार शेख शहनवाज व पंच क्र 01 शेख शमशाद असे त्यांचे कडील मोटारसाईकल ने पोलीस ठाणे गेवराई येथे पाठविण्यात आले त्यांचे पाठीमागे मी, सापळा पथक व पंच क्र 02 श्री सांगुळे असे शासकिय वाहनाने एकमेकांना दिसतील अशा रितीने जावून पोलीस ठाणे गेवराई चे आजु बाजूचे परिसरात तक्रारदर यांचे इशाऱ्याची वाट पाहत थांबलोत.

त्यांनतर तक्रारदार शेख शहनवाज व पंच क्र 01 शेख शमशाद हे पोलीस ठाणे गेवराई मध्ये गेले त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार पंच व एक खाकी ड्रेसवरील पोलीस असे पोलीस ठाणे गेवराई चे गेट चे बाजूस असलेल्या रोडवर येवून आपसात चर्चा केली त्यावेळी तक्रारदार शेख शहनवाज यांनी ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा ईशारा केला. त्यांनतर माझे सुचनेवरून सापळा पथक तात्काळ सक्रिय होवून पंच क्र 02 श्री सांगुळे यांचे सह त्याठिकाणी आले. माझे सुचनेवरून पोलीस अंमलदार खरसाडे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केला त्यांनतर मी पंच क्र 01 शेख शमशाद यांना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र 01 शेख शमशाद यांनी तेथे खाकी ड्रेस घातलेल्या इसमाकडे आंगुली निर्देष करून हेच विजय आघाव पोलीस हवालदार असून यांनी तक्रारदार शेख शहनवाज यांना असे म्हणून डाव्या हाताने लाच रक्कम स्विकारून त्यांनी अंगावर परिधान केलेल्या खाकी पॅन्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवली असे सांगितले. त्यांनतर विजय आघाव पोलीस हवालदार यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवर रंगेहात पकडण्यात आले त्यांनतर मी विजय आघाव यांना माझी, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली त्यांनतर विजय आघाव पोलीस हवालदार यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विजय दिंगबर आघाव वय 45 वर्षे व्यवसाय- नोकरी पोलीस हवालदार बक्कल नंबर 600 नेमणूक -पोलीस ठाणे गेवराई, ता. गेवराई, जि. बीड रा. मातोश्री निवास, साई-पंढरी मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, कालींका नगर, बीड असे सांगितले. त्यांनतर मी पोलीस हवालदार विजय आघाव यांना स्विकारलेल्या लाचेची रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे अंगावर परिधान केलेल्या पॅन्टचे समोरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवल्याचे सांगितले पंच क्र 02 सांगुळे यांनी विजय आघाव यांनी परिधान केलेल्या पॅन्ट च्या समोरील डाव्या बाजूच्या खिशातून लाचेचे 20000/- हजार रूपये काढून घेवून सदर नोटाचे क्रमांक व सापळा पुर्व पंचनाम्यातील नोटाचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली तसेच माझे सुचनेवरून विजय आघाव पोलीस हवालदार यांचे हात, लाचेची रक्कम अल्ट्राव्हालेंट बॉटरीच्या सहाय्याने चेक केले असता विजय आघाव यांच्या उजव्या हातावर व लाचेच्या रक्कमेवर, विजय आघाव यांनी परिधान केलेल्या खाकी रंगाच्या पॅन्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिशाच्या तोंडास हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यांनतर पुन्हा माझे सुचनेवरून तक्रारदार शेख शहनवाज यांचे हातावर अल्ट्राव्हालेंट बॉटरीच्या सहाय्याने चेक केले असता तक्रारदार यांच्या डाव्या हाताचे बोटावर ठिकठीकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसून आली.. त्यानंतर घटनास्थळावर प्राथमिक कारवाई करुन विजय आघाव पोलीस हवालदार यांना पोलीस ठाणे गेवराईचे इमारतीच्या वरच्या मजल्यावरील आघाव यांचे कपाटामधुन आघाव यांचेकडुन तक्रारदार यांचे मेव्हणे चे विरुध्द दाखल गुन्हयाचे कागदपत्र हस्तगत केले. त्यानंतर मी, सापळा पथक, दोन्ही पंच, तक्रारदार व विजय आघाव असे शासकीय वाहनाने लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग बीड येथे परत आलोत. त्याबाबत तशा पंचनामा करण्यात आला.
तरी यातील मुळ तक्रारदार शेख शाहनवाज शेख राजु, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा.संजय नगर, महादेव मंदिराजवळ गेवराई ता.गेवराई जि.बीड यांचे मेव्हणेचे विरुध्द दाखल वाळु चोरीच्या गुन्हयात मेव्हण्यास अटक न करण्यासाठी व गुन्हयाचे तपासात मदत करण्यासाठी दि.08/11/2025 रोजी 15.01 वा.ते 16.30 वा. चे सुमारास पोलीस ठाणे गेवराई येथे 30000/- रुपये लाचेची मागणी करुन लागलीच स्विकारण्याचे मान्य करुन पोलीस ठाणे गेवराई चे बाजुचे रोडवर 18.16 वा. लाच रक्कम 20000/- रुपये स्विकारले असता विजय आघाव यांना लाचेच्या रकमेसह पकडले म्हणुन माझी विजय दिंगबर आघाव, पोलीस हवालदार, बक्कल नंबर 600 नेमणूक -पोलीस ठाणे गेवराई, ता. गेवराई, जि. बीड (वर्ग-3) यांचेविरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिर्याद आहे.
हि फिर्याद दिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.
फिर्यादी

(सोपान सोनाजी चिट्टमपल्ले)
पोलीस उप अधीक्षक,
ला.प्र.वि.बीड.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Kishor Sundarsing Pawar(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.गेवराई.

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Kishor Sundarsing P

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI